सत्यमेव जयते

# राज्य निवडणूक आयोग

## महाराष्ट्र

१ ला माळा, नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग, मुंबई- ४०० ०३२.


(प्रसिद्धिपत्रक) दि. ११ जुलै २०१८.

## वानाडोंगरी नगरपरिषदेसाठी
## १५ ऐवजी १९ जुलैला मतदान

**वडगाव, मुक्ताईनगर, बार्शीटाकळी व पारशिवनीत १६ ऐवजी २० जुलैला मतमोजणी**

मुंबई, दि. ११: न्यायालयीन प्रकरणामुळे वानाडोंगरी (जि. नागपूर) नगरपरिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी आता १५ ऐवजी १९ जुलै २०१८ रोजी मतदान होणार आहे; तसेच १५ जुलै २०१८ रोजी मतदान होणाऱ्या वडगाव (पुणे), मुक्ताईनगर (जळगाव), बार्शीटाकळी (अकोला) आणि पारशिवनी (नागपूर) या नगरपंचायतींसाठी वानाडोंगरीसोबतच २० जुलै २०१८ रोजी मतमोजणी होईल.

राज्य निवडणूक आयोगाने १५ जून २०१८ रोजी निवडणूक कार्यक्रम जाहीर केला होता. त्यानुसार १५ जुलै २०१८ रोजी मतदान होणार होते; परंतु वानाडोंगरी येथील विविध ५ जागांसंदर्भातील निवडणूक निर्णय अधिकाऱ्याच्या निर्णयाविरुद्ध जिल्हा न्यायालयात अपील दाखल झाले होते. ते जिल्हा न्यायालयाने ६ व ७ जुलै २०१८ रोजी फेटाळले; परंतु निवडणूक प्रक्रियेसाठी आवश्यक कालावधी देणे गरजेचे असल्याने आयोगाने सुधारीत कार्यक्रम जाहीर केला आहे.

सुधारीत कार्यक्रमानुसार आता फक्त वानाडोंगरी नगरपरिषदेकरिता १९ जुलै २०१८ रोजी सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० या वेळेत मतदान; तर २० जुलै २०१८ रोजी मतमोजणी होईल. त्यामुळे वडगाव (पुणे), मुक्ताईनगर (जळगाव), बार्शीटाकळी (अकोला) आणि पारशिवनी (नागपूर) या नगरपंचायतींचीदेखील मतमोजणी १६ ऐवजी २० जुलै २०१८ रोजी होईल, असे राज्य निवडणूक आयोगाकडून कळविण्यात आले आहे.

०-०-०

(Jagdish More, PRO, SEC)